# Session 8

## Date : 16/09/25

## News : Jain Gurukul varutaseva

श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, सोलापूर

जैन गुरुकुल वृत्तसेवा

# जैन गुरुकुलात ‘ सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा’ सेमिनार



सोलापूर, दि. १५ सप्टेंबर: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर व क्विक हिल फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात ‘सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा’ हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमामध्ये विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुलातील रत्नप्रभा चंदनशिवे व श्रद्धा मोहिते या विद्यार्थिनींनी सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या विषयावर सेमिनार दिला. या सेमिनार मध्ये त्यांनी आजच्या ऑनलाईन युगामध्ये होणाऱ्या विविध प्रकारच्या फसवणुकीबद्दल सर्वांना काळजी घेण्याविषयी सविस्तर माहिती दिली. OTP कोणास सांगू नये, अनोळखी नंबर वरून आलेल्या फोन कॉल्सची पडताळणी करुण घेणे तसेच व्हॉट्सअॅप व इतर सोशल मीडियावरून आलेल्या मेसेजेस व लिंक ची शहानिशा करा व तसेच हॅकिंग, ऑनलाईन स्कॅम, डिजिटल अरेस्ट अशा विविध स्कॅम ला कसे ओळखावे याचे ही मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. स्ट्राँग पासवर्ड कसा बनवावा आणि आपले सॉफ्टवेअर कसे सुरक्षित ठेवावे याची ही माहिती दिली. मोबाईल, कम्प्युटर, लॅपटॉप इत्यादी साधनांवर अधिकृत अँटीव्हायरसचा वापर करावा हे सांगितले या कार्यक्रमात मुख्याध्यापक राजकुमार काळे, उपमुख्याध्यापक शैलेश पांगळ, पर्यवेक्षक प्रवीण कस्तुरे उपस्थित होते.